सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग,बृहन्मुंबई

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१२,
यांचे कार्यालय, शैलेंद्र नगर, वृंदावन रोड,
दहिसर (पुर्व), मुंबई–४०००६८.

दुरध्वनी 022&28283889

Email ID -dcpzone12-mum@mahapolice.gov.in

वार्तापत्र (**Press note**) दिनांक ०६/११/२०२६

समतानगर पोलीस ठाणे हदिद्त अमलीपदार्थ (एमडी) विक्रीचा गुन्हा उघडकीस आणलेबाबत.

समतानगर पोलीस ठाणे हद्दीत माला हरिश्चंद्र राय व अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा हे रमाशंकर चाळ, बिहारी टेकडी, पोईसर, कांदिवली/पूर्व, मुंबई येथे एमडी हा अंमलीपदार्थ विक्री करीत असल्याची दिनांक २८/०९/२०२६ रोजी गोपनिय माहिती मिळाल्याने नमूद ठिकाणी पोलीस पथक गेले असता माला हरिश्चंद्र राय व अविनाश झा उर्फ लोटा हा घराच्या मागील खिडकीतून छतावर उतरुन पळून गेले. सदरवेळी थोडया अंतरावर पोलीस उभे असल्याचे पाहून माला राय हिने तीच्या खांदयावरील बॅग वर छतावर लपवून ठेवली. पोलीसांनी सदरची बॅग दोन पंचासमक्ष उघडली असता त्यामध्ये २३९ ग्रॅम एमडी (Mephedrone) (किमंत अंदाजे रुपये ७,१७,०००/-),रोख रु ९,००,०००/- तसेच एक वजन काटा मिळून आला म्हणुन १. माला हरिश्चंद्र राय, २. अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा, ३. पुजा राय यांच्या विरुध्द समतानगर पोलीस ठाण्यास गुनोक्र १३३२/२६ कलम ८(क), २२(क),२९ एमडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये दिनांक २९/०९/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत १. माला हरिश्चंद्र राय, २. अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा, ३. पुजा राय हे गुन्हा नोंद केल्या दिवसापासून परांगदा झाले होते. आरोपीत १. माला हरिश्चंद्र राय, २. अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा यांचे वापरत्या मोाबाईलचे तान्त्रिक विश्लेषण केले असता पाहिजे आरोपी माला राय व अविनाश उर्फ लोटा हा तिरुनेलवेली, तामिळनाडू येथे असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर पोलीस पथक तिरुनेलवेली, तामिळनाडू येथे जावून दिनांक २६/१०/२०२६ रोजी आरोपी १. माला हरिश्चंद्र राय, २. अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा यांना ताब्यात घेवून नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. सदर वेळी घरझडतीमध्ये रोख रु २,५०,०००/- (अक्षरी दोन लाख पंन्नास हजार रुपये) पंचनाम्यांतर्गत ताब्यात घेण्यात आलेले आहे.

अटक आरोपीचे नाव – १. माला हरिश्चंद्र राय वय अंदाजे २७ वर्षे राठि रमाशंकर सिंग चाळ, भाजीवाडी, गांवदेवी रोड, पोईसर, कांदिवली/ पूर्व, मुंबई
२. अविनाश मोहननाथ झा उर्फ लोटा अंदाजे ३५वर्षे, राठि जोगिंदर सिंग चाळ, भाजीवाडी बिहारी टेकडी, पोईसर कांदिवली/ पूर्व, मुंबई

सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणणेसाठी मा. श्री शशिकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. गजानन शिवलिंग राजमाने, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमडळ 3, मा. श्री कैलास बर्वे, सहायक पोलीस आयुक्त, समतानगर विभागयांच्या मार्गदर्शनाखाली व वपोनि श्री जयवंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि धनंजय कावडे, सपोनि राउत, पोउनि भोसले, सपोउनि तोंडवळकर, पोहक 03764/शिंदे, पोशि 142577/नाईक, पोशि 170309/वेदांते, मपोशि बलमे, मपोशि देवकाते यांनी अथक परिश्रम करुन सदरचा गुन्हा 1 महिन्याच्या आत उघडकीस आणला आहे.